| | |
|---|---|
| **MHKO030069262020** | नि.फौ. खटला क्र. १९४९/२०२० मधील<br>नि.क्र. १४ खालील आदेश<br>पिंटू सतीश खिंडकर |

प्रस्तुतचा अर्ज हा अर्जदार पिंटू सतीश खिंडकर यांनी फौजदारी प्रक्रिया संहीता, १९७३ चे कलम ४५१ प्रमाणे शाहूपुरी पोलीस स्टेशन गु.र.नं. ५२६/२०२० अन्वये भारतीय दंड संहितेचे कलम ३९२ सह कलम ३४ खालील शिक्षापात्र गुन्ह्या संदर्भात जप्त केलेला मुद्देमाल म्हणजेच हिरो स्प्लेंडर प्लस मोटरसायकल रजिस्टर क्र. एमएच-०९-सीझेड-९५६९, चेसीस क्र. MBHA10AMDHD00655, इंजिन क्र. HA10EJDHD01543 याचा अंतरिम कब्जा मिळणेकरिता दाखल केला आहे.

२. अर्जदारांचे कथनाप्रमाणे सदरहू जप्त वाहन हे त्यांच्या मालकीचे असून त्यांच्या दैनंदिन वापराचे आहे. ते पोलीस ठाण्यात तसेच पडून राहिल्यास त्याचे नुकसान होणार आहे. सदर मुद्देमाल हा अर्जदारांच्या ताब्यात दिल्यास ते त्यामध्ये कोणताही बदल अथवा फेरफार करणार नाहीत किंवा त्याची विक्री अगर तबदीली करणार नाही. त्यामुळे सदर मुद्देमाल त्यांच्या अंतरिम कब्जात मिळावा, अशी विनंती त्यांनी केली.

३. तपासी अंमलदार यांनी नि.क्र. १३ ने म्हणणे देवून कथन केले की, अर्जदार हे आरोपीचे मित्र असून प्रस्तुत वाहन अर्जदारांना परत केल्यास, आरोपी त्याचा उपयोग परत अशाचा प्रकारचा गुन्हा करणेसाठी वापर करु शकतात. सबब, त्यांनी अर्जास हरकत घेतली आहे. सरकारी अभियोक्ता यांनी म्हणणे देवून योग्य ते आदेश पारित करणेत यावेत असे नमुद केले आहे.

४. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. अर्जदाराने नि.क्र. ३/१ कडे जप्त वाहनाचे नोंदणी प्रमाणपत्र, नि.क्र. ३/२ कडे जप्त वाहनाच्या विम्याची प्रत, नि.क्र. ३/३ कडे ओळखपत्राची प्रमाणित प्रत अशी कागदपत्रे दाखल केली आहेत. वर

नमुद कागदपत्रांचे अवलोकन करता, अर्जदार हे जप्त वाहनाचे मालक असल्याचे दिसून येते. ना. सर्वोच्च न्यायालयाने सुंदरभाई अंबालाल देसाई वि. गुजरात सरकार एआयआर २००३ एससी ६३८ या न्यायनिवाड्यामध्ये जप्त वस्तु गरज नसताना पोलीस ठाण्यात पडून ठेवू देवू नये व योग्य त्या अटी व शर्तींवर मालक किंवा संबंधितांना ती परत करावी, असे निर्देश दिलेले आहेत. सबब, सदर जप्त वाहना बाबत अन्य कुणी दावा न केल्याने ते अर्जदारांचे अंतरिम कब्जात देणे योग्य व संयुक्तिक होणारे आहे. म्हणून मी या कामी पुढीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१) अर्ज मंजूर करणेत येतो.

२) शाहूपुरी पोलीस स्टेशन गु.र.नं. ५२६/२०२० चे कामी जप्त केलेला जप्त केलेला मुद्देमाल म्हणजेच हिरो स्प्लेंडर प्लस मोटरसायकल रजिस्टर क्र. एमएच-०९-सीझेड-९५६९, चेसीस क्र. MBHA10AMDHD00655, इंजिन क्र. HA10EJDHD01543 हा अर्जदार यांच्या अंतरिम कब्जात रक्कम रु.२०,०००/- (रु. वीस हजार फक्त) च्या सुपुर्तनामा क्षतीपुर्ती बंधपत्रावर खटल्याचा अंतिम निकाल होईपर्यन्त देणेत यावा.

३) अर्जदार यांनी सदर जप्त वाहन कोणत्याही प्रकारे हस्तांतरित करु नये किंवा नष्ट करु नये किंवा त्याचे स्वरुप बदलू नये किंवा ते कोणत्याही गुन्ह्यात वापरू नये.

४) या न्यायालयाने किंवा अन्य न्यायालयाने आदेश केल्यास जप्त वाहन न्यायालयात हजर करावयाचे आहे.

५) तपासी अंमलदार यांनी जप्त वाहन अर्जदाराचे ताब्यात देताना सविस्तर पंचनामा करुन त्याची छायाचित्रे घेवून ती रे.क्रि.के. नं. १९४९/२०२० चे कामी दाखल करावयाची आहेत.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by Awdhut Ashok Bhosale
Date: 2021.03.19 12:05:54 +0530

ता. १७/०३/२०२१ (ए.ए. भोसले)
कोल्हापूर मुख्य न्यायदंडाधिकारी, कोल्हापूर